


REGISTERED No.-B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख १५ मे १९४६ अंक २०

श्री श्री श्री श्री श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

कंपनीनें चार लक्ष रुपयांचे ऑर्डिनरी शेअर दर शेअरला रु. ५ प्रिमिअम असे विक्रीस काढले आहेत.

**युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण**
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री श्री श्री श्री श्री

## विविध माहिती

**२४ पेक्षा अधिक पाहुण्यांस बंदी**—कोणत्याहि समारंभाचे प्रसंगानें २५ किंवा त्यापेक्षा अधिक पाहुण्यांना खाद्य देतां कामा नये, असा मुंबई सरकारनें हुकूम काढला आहे. सबंध प्रांतास तो लागू आहे.

**ॲटम बॉंब**—अमेरिकेजवळ १,५०० ॲटम बॉंब असून ती आणखी ॲटम बॉंब तयार करीत आहे.

**५० हजार टन तांदूळ देऊं केला**—नेपाळच्या एका जमीनदार व्यापाऱ्यानें मुंबई सरकारला धोतरें व साड्या ह्यांच्या मोबदल्यांत ५० हजार टन तांदुळ देऊं केला आहे. नेपाळच्या सरहद्दीवरून तांदूळ आणण्याचे मार्गांत अडचणी पुष्कळ आहेत.

**मोटार वहातुकीची नवी योजना**—मोटार वहातुक सरकारी मालकीची करण्याची मुंबई सरकारनें एक नवी योजना आंखली आहे. ती अंमलांत आणण्यापूर्वी प्रसिद्ध केली जाईल व तीवर लोकमत विचारलें जाईल.

**सैन्य काढून घेतलें, पण?**—इराणमधून रशियानें आपलें सैन्य काढून घेतलें असलें तरी साध्या पोषाखांत कांहीं सैन्य त्यानें मागें ठेवलें आहे व "तेल तज्ञ" तेहरानच्या उत्तरेकडील प्रांतांत येऊन दाखल झाले आहेत, असें समजतें.

**हिंदी माध्यम**—लखनौच्या विश्वविद्यालयानें येत्या वर्षापासून आपलें शिक्षणाचें माध्यम हिंदुस्थानी करण्याचें ठरविलें आहे. त्यासाठीं आवश्यक तीं पुस्तकें तयार करण्याकरितां खर्चास मंजुरी देण्यांत आली आहे.

**सदर्न मराठा रेल्वे आगगाड्या वाढवणार**—सदर्न मराठा रेल्वेच्या मीटर गेज फांट्यावरील आगगाड्यांची संख्या जून-पासून वाढविण्यांत येणार आहे. ब्रॉड गेजवरील आगगाड्यांची संख्या इतक्यांत वाढवितां येणार नाहीं, कारण त्यांचे डबे लष्करी खात्यास मागें दिले ते अद्याप परत मिळालेले नाहींत. पुणें-बंगळोर फांटा हा मीटर गेजचा आहे.

**इंग्रजांचा बीरवरील खर्च**—प्रत्येक इंग्रज त्यास मिळणाऱ्या प्रत्येक रुपयापैकीं सरासरीनें साडे तीन आणे बीर व इतर पेयांवर खर्च करतो. अन्नावर त्याचे रुपयापैकीं चार आणे खर्च होतात.

दररोज लागणारें ताजें
दहीं
—शेरास ८ आणे—
म. गो. कुलकर्णी
किराणा-भुसार मालाचे व्यापारी,
फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें २.



















पुणें चीफ एजंट्स:—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक पुणें,









# उद्योगधंद्यांस औद्योगिक भांडवलाचा पुरवठा

## फिनॅन्स कॉर्पोरेशनची स्थापना

जुन्यां हिंदी धंद्यांची सुधारणा व विस्तार आणि नव्या धंद्यांची स्थापना ह्यांच्या यशस्वितेस स्थायी व चालू भांडवलाच्या पुरवठ्याची आवश्यकता आहे. कित्येक कारखान्यांची मूळच्या भांडवलाची म्हणजे जमीन, इमारती, यंत्रें ह्यांस लागणाऱ्या भांडवलाची गरज भागली तरी धंदा चालविण्यास लागणाऱ्या तात्पुरत्या भांडवलाची वाण त्यांस भासत असते. ही गरज भागविणें हें व्यापारी बँकांच्या कार्यक्षेत्रांत येतें परंतु यंत्रसामुग्री व इमारती ह्यांच्यासारख्या स्थायी स्वरूपाच्या साधनांस लागणारा पैसा उभारण्याची अडचण हीच खरी मोठी अडचण असते. कारखान्यासाठी कंपनी काढली तरी तिच्या भागांचे विक्रीने पुरेसें भांडवल सत्वर उभें राहूं शकत नाहीं. बँकांच्या ठेवी अल्प मुदतीच्या असल्याकारणानें दीर्घ मुदतीचीं कर्जे बँका देऊं शकत नाहींत. युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेंतील योजनांत ह्या लांब मुदतीच्या भांडवलाच्या पुरवठ्याचा प्रश्न महत्त्वाचा झाला आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर चिंतामणराव देशमुख, ह्यांनीं एक वर्षापूर्वी मुंबईमधील आपल्या एका भाषणांत प्रस्तुत विषयाची चर्चा केली होती. त्याच सुमारास हिंदुस्थान सरकारने आपलें औद्योगिक धोरण जाहीर करून तें साध्य करण्यासाठी इंडस्ट्रिअल इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशनची योजना आखण्याचा आपला बेत प्रकट केला होता.

### व्यापारी बँकांनीं भांडवल पुरवण्यांत धोका

सर चिंतामणराव ह्यांनीं आपल्या भाषणांत इंडियन इंडस्ट्रिअल कमिशन, मध्यवर्ती बँकिंग इन्क्वायरी कमिटी, १९३३ मधील सिमला येथील पांचवी इंडस्ट्रीज कॉन्फरन्स, इत्यादींच्या शिफारशींचा परामर्श घेऊन त्यांतील दोषस्थळें दाखविलीं आणि सामान्य बँकांनीं लांब मुदतीचें भांडवल उद्योगधंद्यांस पुरविण्यांत धोका आहे, असें स्पष्टपणें सांगितलें. जेव्हां (१) उद्योगधंद्यांचें भवितव्य आणि किफायतशीरपणा हीं ज्यास्त निश्चित होतील, (२) बँकांचा स्वतःचा भक्कमपणा वाढेल आणि (३) औद्योगिक उपक्रमांच्या यशस्वितेबद्दलचें बँकर्सचें ज्ञान अधिक पक्कें होईल, तेव्हां बँकांनीं दीर्घ मुदतीचें भांडवल उद्योगधंद्यांस देण्याचा विचार करणें श्रेयस्कर ठरेल; आज तशी परिस्थिति नाहीं, असा त्यांचा अभिप्राय आहे. (१) प्रांतिक सरकारांच्या कक्षेंतील उद्योगधंदे, (२) सरकारी मालकीचे किंवा सरकारी नियंत्रणाखालचे उद्योगधंदे आणि (३) अखिल भारतीय महत्त्वाचे उद्योगधंदे अशा तीन प्रकारच्या उद्योगधंद्यांस औद्योगिक भांडवल पुरविणाऱ्या स्वतंत्र संस्था असणें इष्ट होईल, असें त्यांनीं मत दिलें.

### संस्थांची इंग्लंडमध्यें स्थापना

लहान आकाराच्या धंद्यांस भांडवल उपलब्ध करून देणें आणि तें लांब मुदतीच्या करारानें पुरवणें ह्यासाठी एक, आणि असेंच भांडवल विशिष्ट मोठ्या प्रमाणावरील धंद्यांस देणें ह्यासाठी एक, अशा दोन स्वतंत्र संस्था इंग्लंडमध्यें स्थापन झाल्या आहेत. शेअरबाजार आणि व्यापारी बँका ह्यांचेमार्फत ज्यांस लांब मुदतीचें भांडवल मिळूं शकत नाहीं, अशा उद्योगधंद्यांची गरज भागविणें हा त्यांचा उद्देश आहे. पहिल्या प्रकारच्या संस्थेचें (इंडस्ट्रिअल अँड कमर्शिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन) भांडवल २० कोटि रुपये असुन तिचे भाग व्यापारी बँकांत वाटून दिले आहेत. बाहेरचें ४० कोटि रुपयांचें भांडवल उभारण्याचा तिला अधिकार आहे. "फिनॅन्स कॉर्पोरेशन फॉर इंडस्ट्री" ह्या दुसऱ्या प्रकारच्या संस्थेचें ३२ कोटि रुपयांचें भांडवल विमा मंडळ्या, ट्रस्ट कंपन्या व बँक ऑफ इंग्लंड ह्यांत विभागलेलें आहे आणि १३५ कोटि रुपयांपर्यंत बाहेरचें कर्ज तिला घेतां येईल. इंग्लंडमधील बँकांनीं ह्या दोन्ही संस्थांचें स्वागत केलें आहे, ह्यावरून त्यांच्या स्थापनेमुळें बँकांच्या व्यवहारावर अनिष्ट परिणाम होण्याची भीति नाहीं, हें स्पष्ट होतें.

### ऑल इंडिया इं. फि. कॉर्पोरेशन

हिंदुस्थान सरकारनें एप्रिल, १९४५ मध्यें आपलें औद्योगिक धोरण जाहीर केलें, त्यास अनुसरून स्थापन व्हावयाच्या ऑल इंडिया इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनची योजना आतां बाहेर आली आहे. ह्या कंपनीचें भांडवल ५ कोटि रुपये राहील आणि त्यांपैकीं २ कोटि रुपये भांडवल मध्यवर्ती सरकार भरील. शेड्यूल्ड बँकांना २ कोटि रुपये भांडवल देतां येईल व विमा, ट्रस्ट कंपन्या इत्यादींच्या वाट्यास १ कोटि रुपयांचें भांडवल येईल. सर्वच शेड्यूल्ड बँकांना कॉर्पोरेशनचे भाग घेतां येणार नाहींत; कांहीं किमान रकमेच्या ठेवी ज्या बँकेकडे आहेत अशा बँकेसच कॉर्पोरेशनचे भाग घेण्याचा अधिकार दिला जाईल असें समजतें. ठेवींच्या प्रमाणांत भाग दिले जाणार असल्याकारणानें, मोठ्या बँकांना सहाजीकच ज्यास्त भाग मिळतील. एकट्या इंपीरिअल बँकेच्या वाट्यासच पाऊण कोट रुपयांचे भाग येणार आहेत. इंपीरिअल बँकेच्या खालोखाल सेंट्रल बँक ऑफ इंडिया व बँक ऑफ इंडिया ह्यांचा अनुक्रम लागतो. ब्रिटिश एक्सचेंज बँकांनाहि कॉर्पोरेशनचे भाग घेण्याचा अधिकार मिळावयाचा आहे. विमा कंपन्यांच्या वाटणीस १ कोटि रुपयांचे भाग येणार आहेत, हें वर सांगितलेंच आहे. ह्या भागांची कंपनीवार वाटणी कशी व्हावी, हें त्यांच्या चालू कामावर व हप्त्यांच्या उत्पन्नावर अवलंबून ठेवण्यांत यावयाचें आहे. कॉर्पोरेशनच्या मध्यवर्ती बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या आठ डायरेक्टरांपैकी तिघांची नेमणूक सरकार करील, तीन बँकांतर्फे येतील आणि विमा व ट्रस्ट कंपन्यांस दोन प्रतिनिधी मिळतील असें समजतें. जमा झालेल्या भांडवलावर किमान २½% ची हमी घेण्यांत येईल. परंतु ५% पेक्षा ज्यास्त डिव्हिडंड कधींच देतां येणार नाहीं. त्यांतून प्राप्तीवरील कर अर्थातच कापून घेतला जाईल.

### कॉर्पोरेशनची उपयुक्तता

इंग्लंडमध्यें फिनॅन्स कॉर्पोरेशनच्या व्यवहारास प्रारंभ होऊन एक वर्ष लोटलें तरी हिंदुस्थान सरकारच्या तत्सम योजना अद्याप पक्क झालेल्या नाहींत, ह्यावरून येथील सरकारच्या औद्योगिक धोरणांतील शिथिलपणाची व औदासिन्याची कल्पना येते. युद्धोत्तर औद्योगीकरणाचा एका वर्षापूर्वी जेवढा गवगवा झाला होता, त्या मानानें प्रत्यक्ष अनुभव उत्तेजनकारक नाहीं, असें म्हणणें भाग आहे. नियोजित कॉर्पोरेशनची स्थापना आतां लवकरच होईल, असें दिसतें. भांडवल मिळण्याच्या मामुली मार्गावर अवलंबून राहिलें असतांना जे उद्योगधंदे निर्धूच शकले नसते, असे किती धंदे कॉर्पोरेशनमुळें स्थापन होऊं शकतील, ह्यावर त्याची उपयुक्तता अवलंबून राहील, हें उघड आहे. कॉर्पोरेशन भारी दराने डिव्हिडंड वाटणार नाहीं आणि तिला स्वतःला तिच्या मोठ्या दर्जामुळें अल्प दराने कर्जें मिळूं शकतील, ह्या कारणांमुळें उद्योगधंद्यांस कॉर्पोरेशनकडून उपयुक्त व महत्त्वाच्या सवलती मिळूं शकतील, हा मोठा फायदा आहे. कॉर्पोरेशनची गंगाजळी जसजशी वाढत जाईल, तसतसें तिचें धोरण उद्योगधंद्यांस अधिक सहायकारक होऊं शकेल, हें उघड आहे. कारण, कॉर्पोरेशनच्या व्यवहारांत त्यामुळें लवचिकपणा येण्यास वाव निर्माण होईल. हिंदुस्थान सरकारच्या नियोजित कॉर्पोरेशनचा तपशील प्रसिद्ध झाल्यावर ह्यासंबंधीं ज्यास्त लिहितां येईल.

## स्फुट विचार

### अन्नधान्य परिस्थिति

हिंदुस्थानांत अन्नधान्याची टंचाई दूर करण्याचे उपाय फारसे यशस्वी होणार नाहींत अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. अमेरिकेंतील वृत्तपत्रें हिंदुस्थानांतील दुष्काळी परिस्थितीकडे उपेक्षा बुद्धीनें पाहूं लागलीं आहेत. हिंदुस्थानला दर वर्षी कमींत कमी १० लाख टन धान्य परदेशांतून आयात करावें लागेल असा हिशेब ग्रेगरी कमिटीनें केलेला होता. यंदांच्या दुष्काळी परिस्थितीमुळें ही तूट ४० लक्ष टनांपर्यंत पोचेल असा अंदाज हिंदुस्थान सरकारतर्फे करण्यांत आलेला आहे. हिंदुस्थानांतील धान्यपरिस्थिति युद्धामुळें अधिकच घसरली हें खरें असलें तरी फॅसिस्ट विरोधी युद्धांत हिंदुस्थानने केलेली कामगिरी लक्षांत घेतां जपान आणि जर्मनी यांच्या आधीं हिंदुस्थानांत धान्य पाठविण्याची व्यवस्था व्हावयास पाहिजे. पण प्रत्यक्ष कृति मात्र याच्या अगदीं उलट आहे. येत्या तीन महिन्यांत जपानला ५ लाख टन गहूं पाठविण्याचें अमेरिकेने ठरविलें आहे. सध्यां हिंदुस्थानांत दर माणशीं जितकें धान्य मिळतें त्याच्या दीडपट शिधा आज जपानमध्यें दर माणशीं मिळत आहे. कांहीं दिवसांपूर्वी जपानमधील अमेरिकन सर सेनापति जनरल मॅकार्थर यांनीं अमेरिकन सरकारकडे "अधिक धान्य पाठवा नाहीं तर अधिक सैनिक पाठवा" असें लिहून पाठविल्याचें वृत्त प्रसिद्ध झालें होतें. अन्नटंचाईमुळें जपानमध्यें दंगे होतील त्यासाठीं अधिक धान्य पाठविण्याचा अमेरिकेने निर्णय घेतला आहे. कोणत्याहि राष्ट्रांतील लोकांची उपासमार होऊन अगर करून हिंदुस्थानांत धान्य पाठवा असें कोणीहि म्हणणार नाहीं. पण अमेरिकेंत आणि अर्जेंटायनांत गव्हाचा जळणासाठीं व गुरांच्या अंबोणासाठीं उपयोग केला जात असतां हिंदुस्थानांतील जनतेपैकीं अनेकांना फांके पडावे ही वस्तुस्थिति मात्र उद्वेगजनक आहे. अमेरिका हिंदुस्थानच्या प्रश्नाला फारसें महत्त्व देत नाहीं. पण जर्मनींतील अमेरिकन व्याप्त प्रदेशांतील शिधा वाढविल्याची बातमी आहे. या धोरणाची दिशा अर्थातच राजकारणानें निर्णीत झाली आहे. सयाम–ब्रह्मदेशांतील जपानी चलन बेकायदा ठरविल्यामुळें तेथील शेतकऱ्यांचा कोठल्याच चलनावर विश्वास राहिलेला नाहीं. त्यामुळें तेथील शेतकरी धान्य विकण्यास तयार नाहींत. अशा परिस्थितींत स्वावलंबन एवढा एकच मार्ग आहे.

---

### आंतरराष्ट्रीय संबंधांत अगतिकता

गेल्या कांहीं दिवसांतील आंतरराष्ट्रीय घडामोडींकडे लक्षपूर्वक पाहिलें असतां एकंदरीनें परिस्थितीचें स्वरूप स्पष्ट होण्यापेक्षां अधिक अनिश्चितच होत चाललें आहे असें दिसून येतें. इराणमधील रशिअन सैन्य काढून घेण्याच्या प्रश्नावर सुरक्षिततासमितींत वादळ माजून अखेर तो प्रश्न समितीच्या कार्यक्रमपत्रिकेवर तसाच ठेवण्यांत आला. समितीच्या बैठकीला रशिअन प्रतिनिधि एम. ग्रॉमिको हे उपस्थित राहिले नाहींत. पॅलेस्टाइनमधील अरब-ज्यू भांडणासंबंधीं चौकशी करण्यास गेलेल्या इंग्लंड-अमेरिकेच्या कमिशनने आपला अहवाल प्रसिद्ध केला असून त्याबद्दल अरब लीगने आपलें असमाधान व्यक्त केलें आहे. ब्रिटनच्या मध्यपूर्वेकडील राजकारणांत नाजूक परिस्थिति निर्माण झालेली आहे. पॅलेस्टाइनमध्यें ज्यू लोकांच्या वसतीला उत्तेजन देण्याचें अमेरिकेचें धोरण आहे. उलट ब्रिटनला आज तरी अरब राष्ट्रांच्या सहकार्याची आवश्यकता भासत आहे. त्यामुळें ज्यू लोकांच्या हितसंबंधांना थोडा फार धक्का देऊनसुद्धां अरबांना खुष ठेवण्याचा प्रयत्न ब्रिटन करील. परंतु अमेरिकेकडून मिळणाऱ्या कर्जावर ब्रिटनच्या परदेशीय व्यापाराचें आणि अंतर्गत स्थैर्याचें भवितव्य बऱ्याच प्रमाणावर अवलंबून आहे. अर्थात् अमेरिकेला दुखवितांनाहि ब्रिटनला विचारच पडेल. तथापि अमेरिकेला न दुखवितां अरब राष्ट्रांना आपल्या छत्राखालीं ठेवण्याचें धोरण ब्रिटिश मंत्रिमंडळ अंमलांत आणीत आहे. त्याचें प्रत्यंतर म्हणजे ईजिप्तमधून ब्रिटिश लष्कर काढून घेण्याचा निर्णय. पॅरिसला भरलेल्या बड्या परराष्ट्र मंत्र्यांच्या परिषदेंत इटलीबरोबर करावयाच्या तहासंबंधी एकवाक्यता होऊं शकली नाहीं. ही परिषद चालू असतांच नवीन फ्रेंच घटनेविरुद्ध फ्रेंच जनतेने कौल दिल्यामुळें युरोपांतील राजकारणाचें भिजत घोंगडें कांहीं काळपर्यंत तरी तसेंच पडून राहणार असें दिसतें.

---

### आयुर्विमा कंपन्या आणि वैद्यकीय संशोधन

अमेरिका आणि कानडांतील १४३ आयुर्विमा कंपन्यांनीं मिळून विमेदारांना होणाऱ्या रोगाबाबत संशोधन करण्यासाठीं एक फंड जमविला आहे. या फंडाला वार्षिक ५ लाख, ७८ हजार डॉलर्स येवढी रक्कम मिळणार असून त्यांतून पहिल्याने हृदय आणि शुद्धरक्तवाहिन्या यांच्या रोगासंबंधीं होणाऱ्या संशोधनास मदत करण्यांत येणार आहे. फंडाच्या डायरेक्टर बोर्डावर ९ विमा-कंपन्यांचे अधिकारी नेमण्यांत आले आहेत. सर्वसामान्य जनता व विशेषतः विमेदार यांच्या दृष्टीनेच वरील रोगांकडे प्रथम लक्ष देण्यांत आलें आहे. कारण अमेरिकेंतील एकंदर विमेदारांपैकी ½ मृत्यु वरील अगर तत्संबंधित रोगांपासून होतात असें आढळून आलें आहे. अमेरिकेंतील एकंदर लोकसंख्येच्या मानानें विचार केला तर दर वर्षी सुमारें ४ लाख लोक या रोगांस बळी पडत असून त्यांपैकी १॥ लाख लोक २० ते ६४ वयाच्या मधील असतात. युद्धकालांत—म्हणजे ३॥ वर्षांच्या अवधींत—अमेरिकेंत १४ लाख लोक या रोगांनीं मेले. उलट अमेरिकेच्या सैनिकांपैकीं याच काळांत फक्त २ लाख ७२ हजार सैनिक प्रत्यक्ष लढाईमुळें मृत्यु पावले. आयुर्विमा कंपन्यांचे अर्थशास्त्रांत मृत्युसंभव ही एक महत्त्वाची बाब असल्यामुळें अशा प्रकारचें संशोधन करणें जरूरच आहे. पण मृत्यूंची आंकडेवारी करावयाची ती आणखी एका दृष्टीने करणें जरूरीचें आहे. प्राप्तीवरील कर ज्याप्रमाणे उत्पन्नाच्या गटागणिक वेगवेगळा असतो त्याचप्रमाणे उत्पन्नाच्या गटागणिक ( Income Groups ) मृत्यूच्या संभवाचे आंकडे अनेक दृष्टीने बोधप्रद ठरतील.

---

**भाजीपाल्यासंबंधीं सूचना**—"हिंदी लष्करास लागणारा भाजीपाला ह्यापुढें शांतता काळांतील पद्धतीप्रमाणें कंत्राटदारांकडून घेण्यास प्रारंभ होईल व त्यामुळें नागरी मागणी पुरी पडणें कठीण जाण्याचा संभव आहे, तरी प्रांतिक सरकारांनीं योग्य ती योजना करावी" अशी त्यांस मध्यवर्ती सरकारनें सूचना केली आहे. प्रत्येक प्रांत आपल्या प्रांतांतील परिस्थिति लक्षांत घेऊन योग्य तें धोरण आखीत आहे.

**बंगाल सरकारची योजना**—सुमारें ५१ हजार एकर जमीन लागवडीस उपयोगी पडणारी १४ लक्ष रुपयांची योजना बंगाल सरकारने आंखली आहे.

# उज्ज्वल भवितव्याचा धंदा: साखर

ले. तात्या तेंडुलकर, कोल्हापूर

साखर ही वस्तु हिंदुस्थानला अत्यंत प्राचीन काळापासून परिचित आहे. 'शर्करा' हा शब्द अनेक संस्कृत ग्रंथांतून आढळतो. त्याकाळीं साखरेचा उपयोग नैवेद्याकडे, उत्सव-विशेष प्रसंगीं व औषधोपचारासाठी केला जात असावा असें दिसतें. मध व काकवीपासून खडीसाखर करण्याच्या पद्धति अद्याप अनेक खेड्यांतून नजरेस येतात. मात्र ती आजच्याप्रमाणें दैनंदिन गरजेची वस्तु झाली नव्हती. गूळ कितीही मिळत असला किंवा आरोग्यदृष्ट्या हितकारक असला तरी राहाणीचे बदलत्या मानाबरोबर वाढत्या क्रयशक्तीबरोबर साखरेची मागणी वाढतच जाणार! गुळाबद्दल निर्माण होत चाललेली अप्रीति व साखरेची वाढत चाललेली गोडी हें याचें कारण आहे.

**वाढती मागणी**—मध्यंतरीं कांहीं काळ साखरेच्या धंद्यास मंदीचा गेला. परंतु युद्धाच्या वाढत्या स्वरूपाबरोबर ही मागणी वाढत गेली. इराक, इराण वगैरे देशांकडे हिंदी साखर पाठविण्यांत आली. सैन्यासाठी मोठ्या प्रमाणावर साखर खरेदी होऊं लागली.बेकारी नाहीशी होऊन लोकांचे हातांत पैसा खेळूं लागल्यामुळें राहाणीचे मानांत फेरबदल झाला. जो वर्ग आतां-पर्यंत गूळ वापरीत होता, त्या वर्गाकडूनही साखरेस मागणी येऊं लागली. अनेक वेळां गुळाचे दर साखरेपेक्षां वाढल्यामुळें साखर वापरणें सोईचें वाटूं लागलें. युद्धापूर्वी हिंदी बहुजनसमाज जरी गूळ वापरणारा होता तरी रेशनिंगमुळें थोड्याफार प्रमाणांत साखर सर्वांनाच देण्यांत येऊं लागली. युद्धपूर्वकाळांत (१९३९) सर्वसाधारणपणें १०,८०,००० टन साखर हिंदुस्थानला लागत होती तर ही मागणी आज ५० टक्यांपेक्षां अधिक पटीनें वाढली आहे. वाढतें औद्योगीकरण, लोकसंख्येंत होत चाललेली वाढ, शहराची वाढती लोकसंख्या, वाढतें दळणवळण, इत्यादींमुळें ही मागणी यापुढें वाढतच जाणार. म्हणजे अत्यंत नजिकच्या काळांत हिंदुस्थानच्या साखरविषयक गरजा पुऱ्या होण्यासाठीं कमींत कमी १६ लक्ष टन साखर उत्पादनाची गरज आहे. पण १९४५-४६ च्या आकडेवारीप्रमाणें हें उत्पादन शिकस्तीचें होऊनही १३ लक्ष टनच आहे. म्हणजे आणखी तीन लक्ष टन साखरेची गरज तत्काळ अशी आहे. ही पुरी झाल्याशिवाय साखरेची टंचाई दूर होणार नाहीं. जर १६ लक्ष टन साखरेचें हिंदुस्थानांत उत्पादन झालें तर ५००० लोक-संख्येपेक्षां अधिक वस्ती असलेल्या गांवांत वस्ती करणाऱ्या प्रत्येकाचे वांट्यास दर वर्षी २५ पौंड साखर येईल व इतर लोकसंख्येस माणशीं सहा पौंड साखर मिळेल. इतर देशांशीं तुलना करतां हें प्रमाण सर्व-साधारणपणें किती पडतें व किती वाढ होणें आवश्यक आहे याची कल्पना येईल:—

| देशाचें नांव | दरमाणशीं साखरेचें प्रमाण (पौंडांत) |
|---|---|
| ऑस्ट्रेलिया | ११६ |
| ग्रेट ब्रिटन | १०६ |
| अमेरिका | ९७ |
| जपान | ३३ |
| हिंदुस्थान | २७ (२० पौंड गूळ जमेस धरून) |

यावरून साखर धंद्याचे वाढीस अद्याप किती क्षेत्र आहे, तें स्पष्ट होतें.

**धंद्यानें मारलेली आघाडी**

आधुनिक पद्धतीच्या साखर धंद्याची खरी सुरवात, संरक्षक जकातीं-नंतरच म्हणजे १९३२ पासून झाली. यापूर्वी म्हणजे १९३१-३२ सालीं हिंदुस्थानांत आधुनिक पद्धतीचे ३२ साखर कारखाने होते व ते १,५८,००० टन साखर निर्माण करीत होते. या पंधरा वर्षांच्या अवधींत या धंद्यानें मारलेली आघाडी व व्यापलेलें कार्यक्षेत्र प्रशंसनीय असेंच आहे! आज (१९४५-४६) हिंदुस्थानांत १५४ कारखाने असून, त्यांतून १३ लक्ष टन साखर निर्माण होत आहे. हा धंदा कापड गिरण्यांखालोखाल दुसरा मोठा धंदा असून, यांत ३५ कोटी रुपये भांडवल, १,२०,००० मजूर व दोन कोटी शेतकरी इतका वर्ग गुंतला आहे. यांतून निर्माण होणाऱ्या मालाची किंमत अंदाजी १५० कोटी रुपये आहे.

या धंद्याच्या विस्तारासंबंधींची योग्य कल्पना खालील तक्त्यावरून येईल.

| प्रांताचें नांव | उंसाखालील क्षेत्र (हजार एकर) | | कारखान्यांची संख्या | | उत्पादन टन | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९३१-३२ | १९४३-४४ | १९३१-३२ | १९४३-४४ | १९३१-३२ | १९४३-४४ |
| संयुक्त प्रांत | १५,९३ | २१,९२ | १४ | ७० | ७३०००, | ७,२७,१०० |
| बिहार आणि ओरिसा | २,८२ | ४,५६ | १२ | ३३ | ६८०००, | २,१२,४०० |
| पंजाब | ४,७५ | ५,५३ | २ | २ | | ११,२०० |
| बंगाल | २,३३ | ३,३९ | — | ८ | | १३,६०० |
| मद्रास | १,१७ | १,४८ | २ | १२ | | ३९,२०० |
| मुंबई | ९९ | १,६९ | २ | १० | १७०००, | ८१,२०० |
| वा. सरहद्द प्रांत | ४४ | ९० | — | १ | | ६,२०० |
| इतर–संस्थानें इ. | २२९ | — | — | १८ | | १,३५,८०० |
| एकूण | २०७२ | ४१३४ | ३२ | १५४ | | १२,१६,००० |

या तक्त्यावरून ही गोष्ट चटकन नजरेस येते कीं, १०३ साखर-कारखाने व ७० टक्के उत्पादन संयुक्त प्रांत व बिहार या दोन प्रांतांतच केंद्रीभूत झालेलें आहे. साखरेच्या खपाच्या दृष्टीनें विचार करतां मुंबई प्रांताचा पहिला नंबर लागतो. पण मुंबई प्रांतांत १० च. साखर कारखाने असून उत्पादन ८१,००० टन आहे.

हिंदुस्थानांत साखर धंद्याची एवढी प्रचंड वाढ झालेली आहे कीं, साखर उत्पादनाच्या बाबतींत हिंदुस्थानचा जगांत पहिला नंबर आहे. ही वाढ नजिकच्या काळांत आणखीहि होण्याचा संभव आहे, असें असलें तरी आमचा साखर उत्पादनावरील खर्च तुलनात्मक दृष्ट्या अधिक आहे. या खर्चांत मोठ्या प्रमाणावर बचत घडवून आणल्याखेरीज या धंद्यास चिरस्थायी स्वरूप प्राप्त होणार नाहीं. कारण संरक्षक जकाती उठविल्यास हा धंदा जावा, सुमात्रा येथून येणाऱ्या साखरेपुढें टिकाव धरूं शकणार नाहीं. म्हणून हा संरक्षक जकातींचा काळ आणखी पांच वर्षे वाढवून घेणें. या मुदतींत धंद्यांत योग्य त्या दृष्टीनें सुधारणा घडवून आणून उत्पादन खर्चांत बचत घडवून आणणें व धंद्यास स्थैर्य आणणें आवश्यक आहे.

**साखर उत्पादनावरील खर्चांत बचत व्हावी म्हणून—**

दर एकरीं अधिक उत्पादन देणाऱ्या, साखरेचें प्रमाण अधिक असणाऱ्या; रोगराईस दाद न देणाऱ्या अशा जातीच्या उंसाची निपज व प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला पाहिजे. ऊंस करण्याच्या पद्धतींत सुधारणा, खतें, औतें, पाणी पुरवठा यांत बचत, उंसाच्या जागेपासून कारखान्यापर्यंत ऊंस पोंचविण्याच्या जलद व स्वस्त सोयी झाल्यास यावरील खर्चांत मोठीच बचत होईल. हिंदुस्थानांतील उंसाचें दर एकरीं उत्पादन क्युबाच्या ⅓ व जावाच्या ⅕ इतकें आहे. हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांतच तुलना करावयाची झाल्यास कोल्हापूर व आजूबाजूस एकरीं सर्व साधारणपणें पन्नास टन ऊंस होतो, मुंबई इलाख्यांत इतर ठिकाणीं ३० ते ४० टन ऊंस येतो, तर संयुक्त प्रांत व बिहारमध्यें हें पीक एकरीं १५ ते २० टन येतें. अर्थातच या दर एकरीं कमी पिकाचे साखरेच्या किंमतीवर परिणाम होतात. तसेंच साखरेचा उतारा हैद्राबाद (द.) ९, मद्रास ९.१८, म्हैसूर ९.८१, संयुक्त प्रांत १०.१० असा आहे तर मुंबई इलाख्यांत याचें प्रमाण ११.०८ इतकें आहे. यावरून संशोधन मोठ्या प्रमाणावर होणें किती आवश्यक आहे व यांत किती बचत होणें शक्य आहे तें दिसून येतें.

(२) दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे प्रत्येक कारखान्यानें स्वतःच्या गरजा भागतील इतका ऊंस स्वतःच पिकविणें ही होय. आज उंसाचे कारखान्याचे आजू बाजूस शेतकरी हे आपापल्या शेतांतून ऊंस पिकवीत असतात व त्याची किंमत दरवर्षी हंगामाप्रमाणें ठरविली जाते. उंसाचें पीक अधिक आल्यास किंवा जास्त एकर जमिनींत ऊंस केल्यास उंसाची किंमत उतरते तर पीक कमी आलें किंवा कमी एकरांत ऊंस केला गेला तर उंसाचे भाव वाढतात. तसेंच यामुळें निश्चित असा ऊंस पुरवठा कारखान्यांना होईलच असें सांगतां येत नाहीं. यामुळें दर वर्षी साखर उत्पादनाची किंमत कमी अधिक होते. या किंमती ठराविक पातळींत राहाव्यात व त्यांना ऊंसपुरवठा निश्चित असा व्हावा, म्हणून कारखान्यांच्या मालकीचे 'फार्म' असूं देण्यास सरकारनें शक्य तें सहाय्य दिलें पाहिजे किंवा गरजेप्रमाणें 'फॅक्टरी एरिया' जाहीर करून दर निश्चिति करून देण्यास योग्य तें सहाय्य देणें आवश्यक आहे किंवा यास दुसराहि एक मार्ग आहे व तो म्हणजे शेतकऱ्यांना कारखान्याच्या नफ्यातोट्यांत भागीदारी निर्माण करून देणें हा होय. असें झाल्यास आपल्या जमिनी कारखान्यास देण्यास ते कुरकुर करणार नाहींत. शेतकऱ्यांकडून मिळणाऱ्या उंसाची साखर करणें, ती बाजारांत विकणें व येणारी किंमत १/३ : २/३, १/२ : १/२ किंवा २/३ : १/३ या प्रमाणांत वांटून घेणें, अशा तऱ्हेचा मार्ग निघण्याचाहि संभव आहे.

(३) लहान कारखानदारी विरुद्ध मोठी कारखानदारी यांमध्यें जो फरक असतो तोच साखर कारखान्यांना लागू असल्यामुळें लहान कारखान्यांतील उत्पादनास अधिक खर्च येतो तर मोठ्या कारखान्यांतील उत्पादनांत अनेक तऱ्हेची बचत व मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत असल्यामुळें खर्च कमी येतो. उत्पादन स्वस्त होतें. म्हणून लहान लहान कारखान्यांचे शक्य तितक्या मोठ्या प्रमाणावर विस्तार करणें व नवीन कारखाने ५०० टनापेक्षां अधिक मोठे असलेलेच सुरू करणें धंद्याच्या दृष्टीनें आवश्यक व हितावह आहे. असें झाल्यासहि उत्पादनावरील खर्चांत बचत होईल.

(४) खर्चांत बचत करण्याचा आणखी एक प्रमुख मार्ग, साखरेपासून इतर पदार्थ निर्माण करणें व फुकट जाणाऱ्या मालापासून दुय्यम प्रतीचे धंदे सुरू करणें हा आहे. हिंदी साखर कारखान्यापासून दर वर्षी चार लक्ष टन काकवी (मोलॅसीस) निघत असून तिचा अद्याप योग्य प्रकारें उपयोग केला जात नाहीं. यापासून पॉवर आल्कोहोल, रेक्टिफाईड स्पिरीट, फूड ईस्ट, जनावरांना आहार इत्यादि उत्पादन केल्यास हें एक फायद्याचें क्षेत्र होईल. हिंदुस्थानला दर वर्षी बारा कोटि गॅलन पेट्रोल लागत असून यापैकी ८५ टक्के पुरवठा बाहेरून व्हावा लागतो. तेव्हां पेट्रोलमध्यें पॉवर आल्कोहोल मिसळण म्हणून वापरल्यास पेट्रोलमध्यें व खर्चामध्यें बरीच बचत होईल. १९३८ सालीं संयुक्त प्रांत व बिहार सरकारनें नेमलेल्या पॉवर आल्कोहोल व मोलॅसिस कमिटीचे मताप्रमाणें पॉवर आल्कोहोल ६ ते ७ आणे गॅलन पडतो. तसेंच साखरेपासून कन्फेक्शनरी, जाम, जेली, टॉफी चॉकोलेट्स इत्यादि पदार्थ निर्माण केल्यास खर्चांत बचत होईल व नफ्यांत भर पडेल.

युद्धकाळापूर्वी हा धंदा विशेष नफ्याचा नव्हता. परंतु आतां शेंकडा शेंभरापेक्षांहि अधिक नफा या धंद्यास होत आहे. स्वताईच्या काळांत हिंदी जनतेनें साखरेस जास्त किंमत देऊन हा धंदा राष्ट्रीय भावनेनें जगविला व वाढविला आहे; ही गोष्ट कारखानदार वर्गानें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. 'जास्त व्यापार आणि कमी नफा' हें हेन्री फोर्डचें घोषवाक्य हिंदी साखर कारखानदारांनीं व इतर हिंदी कारखानदारांनींहि आपला आदर्श म्हणून नजरेसमोर ठेवणें आवश्यक आहे. असें झाल्यास साखर स्वस्त विकतां येणें शक्य होईल. बाहेरून साखर येणार नाहीं. हिंदी साखर बाहेर पाठविणें शक्य होईल व जो वर्ग आतांपर्यंत साखर महाग असल्यामुळें (व ती विकत घेण्याइतका पैसा जवळ नाहीं म्हणून) ती विकत घेऊं शकत नव्हता तोच वर्ग साखर स्वस्त झाल्यास वापरूं लागेल. गिऱ्हाइकांत मोठ्या प्रमाणावर भर पडेल. म्हणून साखर उत्पादनांत मोठ्या प्रमाणावर वाढ करणें व ती स्वस्त विकण्याचा प्रयत्न करणें आवश्यक आहे. कारण 'साखर' हा उज्ज्वल भवितव्य असलेला धंदा आहे.

★ वृद्धापकाळची तरतूद
★ कुटुंबाचें संरक्षण
★ मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न

हे सर्व प्रश्न आयुष्याचा विमा उतरल्यानेंच सुटूं शकतात. तरी आपला विमा पुणें येथील सुप्रसिद्ध

कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी लि.

मध्येंच उतरा.

—सर्वत्र एजंट्स नेमणें आहेत.—

खालील पत्त्यावर लिहा अगर भेटा

अध्यक्षः—ल. ब. ऊर्फ अण्णासाहेब भोपटकर

अ

श्री. म. जोशी,
मॅनेजिंग डायरेक्टर

दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन
श्री. वा. पु. वर्दे, श्री. न. ग. पवार, श्री. श्री. गो. मराठे,
श्री. र. चिं. सोहनी, श्री. मा. रा. जोशी, श्री. त्र्यं. वि. रानडे,
श्री. फ. दो. पद्मजी, श्री. म. वि. गोखले, श्री. मा. वि. शहा.

—भाण्डवल—

अधिकृत रु. ५०,००,००० खपलेलें रु. २५,००,०००
जमा रु. १२,५०,००० रिझर्व्ह व इतर फंड
रु. ३,००,०००
एकूण खेळतें भाण्डवल रु. १,७०,००,०००

—:शाखा:—

डेक्कन जिमखाना, खडकी, मुंबई (फोर्ट) गिरगांव, जळगांव, नागपूर, कोपरगांव, रत्नागिरी, व फैजपूर (पे-ऑफिस)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एक्झिक्यूटर व ट्रस्टी कंपनीचे कामास सुरवात झाली आहे.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

## शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्., शिवाजी नगर, पुणें ५)

अंदाजपत्रक बाहेर पडल्यापासूनचें तेजीचें वातावरण व धंदेवाईक सटोडियांची बाजारावरील पकड अजून कायम आहे. नवीन तेजी होण्यास आज तरी कुठलेंच कारण दिसत नाहीं. उलट सर्व देशभर उठलेली रेल्वे आदि संपाची वावटळ, काँग्रेस सरकारचें मजूरविषयक सहानुभूतीचें धोरण, आसाम सरकारनें उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयकरण करण्यासंबंधीं काढलेलें पत्रक व त्याच्या पाठोपाठ इतर प्रांतहि तोच कित्ता गिरविण्याची शक्यता, मध्यंतरीं नवें मध्यवर्ती सरकार स्थापन होऊन परवांच्या ब्रिटिश पत्रानें भाकित केल्याप्रमाणें तेथें सरदार वल्लभभाई प्रमुख झाल्यास राष्ट्रीयकरणाच्या धोरणास मिळणारी पुष्टी, सरकारचा चलनविकासाचा मंदावलेला वेग इत्यादि कारणें तेजीस विघातक दिसतात. आधींच भाव गगनाला भिडले असतां या भावांत गुंतविणारांना घ्या म्हणून सांगणें म्हणजे खड्यांत उडी मारावयास सांगण्यासारखें होय. नाहीं म्हणण्यास नवीन बँकांपैकी जयपूर, हिंदुस्थान कमर्शिअल यां दोन बँकांचे शेअर्स चालू भावांत—अनुक्रमें ७८—८० व ५८—६० घेऊन ठेवल्यास निश्चित वाढवा येईल. सेंट्रल बँकहि विचारांत घेण्यासारखी आहे. बाकी सध्यांच्या सट्टेबाजीच्या मंडईंत खऱ्या गुंतविणारांना कोठेंच स्थान नाहीं. वर्ष-दोन वर्षें बँकेंत रोकड ठेवणें अथवा नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेट्स घेणें यापलीकडे धाडस करूं नये असें वाटतें.

---

### ४ कोटि रुपयांस शेअर्स घेतले

कानपूर येथील स्वदेशी कॉटन मिल्स ही हिंदुस्थानांतील मोठ्या गिरण्यांपैकी एक मोठी गिरणी आहे. तिच्या भागांपैकी तीन-चतुर्थांश भाग सर हेन्री हॉर्समन व त्यांचे बंधु मि. आल्बर्ट हॉर्समन ह्यांचेकडून ३ कोटि, ८५ लक्ष रुपयांस तिघां जणांनीं विकत घेतले आहेत. त्यांपैकी दोघेजण कानपूरचे असून एक कलकत्ता येथील आहे. त्यांचीं नांवें राय बहादूर रामेश्वरप्रसाद बागला, श्री. हरिशंकर बागला व श्री. जयपुरिया अशीं आहेत. सुमारें १२ लोक हे शेअर्स घेण्यासाठी खटपट करीत होते.

---

### १९४५–४६ चा मार्केट रिव्ह्यू*

मेसर्स आर. आर. नाबर आणि कं. ( प्रोप्रायटर श्री. व्ही. पी. वर्दे ) ह्यांनीं दरसालप्रमाणें आपला १९४५–४६ चा "मार्केट रिव्ह्यू" प्रसिद्ध केला आहे. छपाईच्या व इतर अडचणींमुळें; हें पुस्तक प्रसिद्ध होण्यास बराच विलंब लागला आहे. १९४५ मधील आर्थिक परिस्थितीचें तपशीलवार सिंहावलोकन करून १९४६संबंधीं अपेक्षा प्रस्तुत पुस्तकांत देण्यांत आल्या आहेत. "हिंदी उद्योगधंद्यांना येते दिवस उत्कृष्ट जातील" अशी अपेक्षा आहे. बराच काळ अतृप्त राहिलेली मागणी, युद्धानें ग्रासलेल्या देशांची प्रचंड मागणी, हिंदुस्थानाच्या पुनर्घटनेच्या योजना, इत्यादि गोष्टी हें सूचित करतात. स्पर्धेची अद्याप फारशी भीति नाहीं आणि उद्योगधंद्यांना सहानुभूति दर्शविणारें मध्यवर्ती सरकार लवकरच स्थापन होण्याचा योग आहे. उतरत्या व्याजाच्या दरामुळें सरकारी कर्जावरील व्याज खालीं खाली जात चाललें आहे, त्यामुळें कर्जरोख्यांच्या किंमती वाढत्या रहाण्याचा रंग दिसतो. शेअर्सचे भाव आज ना उद्यां व्याजाच्या सर्वसाधारण दराशीं मिळते होणें अपरिहार्य आहे.


**१९४४ मधील प्रगति**

—तुलनात्मक आंकडे—

१९४३ सालीं पूर्ण झालेलें काम ८,००,००० रु.वर

१९४४ सालीं पूर्ण झालेलें काम ११,००,००० रु.वर

विमा हप्त्यांचें उत्पन्न १९४४ सालीं १,८३,००० रुपयांचे वर झालें. खर्चाचें प्रमाण उतरलें आहे व त्या प्रमाणांत लाइफ फंडांत वाढ झाली आहे.

**दि ट्रस्ट ऑफ इंडिया**

ॲशुअरन्स कं. लि. पुणें.

मॅनेजर, व्ही. एच. देशमुख, बी. ए. — अध्यक्षः—श्री. सरदार जगन्नाथमहाराज पंडित

**दोन सौंदर्य प्रसाधनें**




पुणें —सिटी पोस्टासमोर. मुंबई—गिरगांव व काळबादेवी



# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

खपलेलें भांडवल : २,९७,६७,१०० रु.
वसूल झालेलें भांडवल : १,४८,८३,५५० रु.
रिझर्व्ह फंड : १,८३,३३,५५० रु.

मुख्य कचेरी : ओरिएन्टल बिल्डिंग, मुंबई.

—शाखा—

अहमदाबाद
- भद्र ( मुख्य ऑफिस )
- एलिस ब्रिज
- स्टेशन ब्रँच
- माणेक चौक

अमृतसर
अंधेरी ( मुंबई शेजारीं )
बांद्रे ( मुंबई शेजारीं )
भुज ( कच्छ )
मुंबई
- बुलियन एक्सचेंज
- कुलाबा
- काळबादेवी
- मलबार हिल

कलकत्ता
- क्लाईव्ह स्ट्रीट ( मुख्य ऑफिस )
- बडा बझार
- चौरंगी स्केअर

कोइमतूर
हैद्राबाद ( सिंध )
जमशेदपूर
जुनागड
कराची
मद्रास
नागपूर
- किंग्जवे
- इतवारी बझार
पालनपूर
पुणें
पुणें शहर
राजकोट
सुरत
वेरावळ

लंडन एजन्ट्स : दि वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

न्यूयॉर्क एजन्ट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

—डायरेक्टर्स—

सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. ( चेअरमन ); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के., नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण; ना. सर शांतिदास आस्करण, नाइट; श्री. महंमद सुलेमान कासम मिठा.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

कांहीं ठिकाणें सोडून दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० पेक्षां अधिक शिलकेवरील व्याज फक्त खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं.

कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य दरानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

वुइल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते आणि ट्रस्टीचें सर्वसाधारण काम स्वीकारते. अर्ज करून नियम मागवावेत.

सर्वसाधारण बँकिंगचा व्यवहार केला जातो.

एच्. ए. करीमभॉय
एजंट



## विनचूकच्या माहितीनें

स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.

किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.
१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, मुंबई नं. २७.

पुना स्टॉकिस्ट : सितारामं एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.

—इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत :—



## सन १९४५ मधील प्रगति

नवें काम ७,००,००० रु.
चालू काम १०,००,००० रु.
१९४५ मधील हप्त्यांचें उत्पन्न
सुमारें १,००,००० रु.
खर्चाचें प्रमाण फक्त ११%

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —


## दि औंध म्यूच्युअल लाइफ अॅश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे
सुपरिंटेंडेंट

व्ही. जी. जोशी
मॅनेजिंग डायरेक्टर



## पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २७७३८



## पैसा आणि ज्ञान वाढवा !

श्रीमंत कसें व्हावें ?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हें भाग्यवर्धक पुस्तक हजारों रु. मिळवून देईल ! किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापार उद्योगधंद्यांत नक्की यश कसें मिळवावें तें शिकवितें. किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक काम सौख्याचें सुंदर विवेचन करतें. किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक ! किं. १ रु.

—आजच लिहा—

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० करांड, जि. सातारा.



## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



## रक्तवर्धक



आयुर्वेद रसशाळा
पुणें लि. पुणें ४.

# मुंबई शेअर बाजार

वर्ग पुस्तकें बंद

इंडि. युना. मिल्स ३-५-४६ ते ३१-५-४६

व्याज-वजा

स्वदेशी रु. २२ दि. १५-५-४६

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

इंडि. यु. ऑ. ०-१५-० दि. १०-६-४५

इंडि. यु. डि. ०-३-० दि. १०-६-४५

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | बुधवार ८।५।४६ | गुरुवार ९।५।४६ | शुक्रवार १०।५।४६ | शनिवार ११।५।४६ | सोमवार १३।५।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २९५७—८ | २९८६—४ | २९९०—० | २९९२—८ | २९९७—६ |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५२३—० | ५२७—० | ५२७—० | ५२७—० | ५३३—८ |
| २२२२-८; १७६३-१२ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २४५२—८ | २४९८—१२ | २५१२—८ | २५३२—८ | २५४३—१२ |
| ७०२; ५६६ | १९—०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ९३२—० | ९३५—० | ९३७—० | ९४५—० | ९४६—० |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ८०५—० | ८१४—० | ८१४—० | ८२३—० | ८३३—० |
| ४४३-८; ३६० | ५-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ४८८—० | ४९३—८ | ४९१—० | ४९३—० | ४९४—० |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ४२२—८ | ४२८—० | ४३२—० | ४३४—८ | ४३२—० |
| ३३५; २८३-८ | ८-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३८९—० | ३९१—० | ३९४—० | ३९३—० | ३९२—० |
| ३३७; २४३ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४१७—८ | ४२०—८ | ४१७—० | ४२८—० | ४३०—० |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ५-४-६ | ५—४ | ५—५ | ५—५ | ५—५ |
| १७ १०; १३-७-० | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २२—३ | २२—८ | २१—९ | २२—१० | २२—८ |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | ४-३-६ | ४—४ | ४—४ | ४-४-६ | ४-४-९ |
| ७९०; ६४५ | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ८९३—१२ | ९०१—४ | ९१०—० | ९१७—८ | ९१७—८ |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २५१—४ | २५२—४ | २५२—८ | २५१—१२ | २५३—० |
| २५६; २१३-८ | ८-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २९२—० | २९७—० | २९६—८ | २९५—० | २९५—० |
| ५९२-८; ५१०-० | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६५२—८ | ६५२—८ | ६५५—० | ६६०—० | ६५७—८ |
| ४३-७; ३०-१२ | ०-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४२—१३ | ४३—५ | ४४—० | ४५—४ | ४५—० |
| | | | ३½% रोखे | १०० | १०२-११-६ | १०२—११ | १०२—१२ | १०२—१३ | १०२—१३ |

सोमवार दि. १३-५-४६ चे भाव

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४६ | १०१—८ | बरोडा | २०६—० | आंध्रा व्हॅली | १८८०—० | अलकॉक | ६१२—८ |
| १९५१-५४ | १०२—२ | सेंट्रल | १३५—८ | बॉम्बे ट्रॅम | १६०—४ | बॉंबे स्टीम | ७३५—० |
| १९५७ | १०२—५ | इंडिया | २६०—० | टाटा हायड्रो | २२०—० | न्यू इंडिया | १२५—० |
| १९५९-६१ | १०२—५ | इंपी० { | २६८०—० | टाटा पॉवर | १९८२—८ | शिवराजपुर | ५९—० |
| १९६३-६५ | १०२—११ | | ६९०—० | | | टाटा केमिकल | २७—८ |
| १९६६-६८ | १०२—५ | रिझर्व्ह | १७७—० | | | टाटा ऑईल | १३२—८ |
| १९७०-७५ | १०२-३-६ | युनियन | २०—८ | | | | |

## शेड्यूल्ड बँकांच्या परिस्थितीचे तुलनात्मक आकडे

( आकडे हजार रुपयांचे )

| | २६-४-१९४६ | १९-४-१९४६ | २७-४-१९४५ | १-९-१९३९ |
|---|---|---|---|---|
| १. हिंदुस्थानांतील मागणीबरहुकूम द्यावयाचें देणें | ६९३,५१,७५ | ७०१,०७,४० | ६०४,५९,८९ | १३४,३६,४९ |
| २. हिंदुस्थानांतील मुदती देणें | ३०३,९४,९२ | ३०२,३६,५८ | २२३,१७,२० | १०२,२४,३४ |
| ३. हिंदुस्थानांतील रोख शिल्लक | ३८,२५,४० | ३६,२५,०७ | ३०,१४,५६ | ६,६९,९२ |
| ४. रिझर्व्ह बँकेजवळ ठेव | ८०,६३,२४ | ७२,७९,०३ | ७७,३१,०० | २५,१७,१९ |
| ५. हिंदुस्थानांत दिलेलीं कर्जें | ३६७,२४,९९ | ३६९,२४,१९ | २७८,२२,३० | १०१,५२,१६ |
| ६. हिंदुस्थानांत डिस्कौंट केलेल्या हुंड्या | २१,२२,२४ | २१,६२,३६ | १४,५८,९६ | ३,५७,२९ |

## —: साठे बिस्किटें :—

थ्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसहि पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-treaders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्ष : श्री. माधव रामचंद्र जोशी, बी. ए. कागदाचे व्यापारी.


### महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.





हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, ( प्रो. ऑ. डेक्कन जिमखाना )